दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -१०४ शुक्रवार,दि.२० डिसेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-104 Friday, Dt.20 December 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


## संतोष देशमुख हत्येची चौकशी सीआयडी पोलिस महासंचालक करणार:मुख्यमंत्री फडणवीस सविस्तर निवेदन करणार सादर, तपासाची कार्यक्षमता गृहविभाग ठरवणार

# बीड जिल्ह्यात मानवतेचे धिंडवडे

## गुन्हेगार आणि त्यांना बळ देणाऱ्यांवर रा.सु.का., मोक्का किंवा एम.पी.डी.ए. कायद्यानुसार कठोर कारवाई करा - आ.सुरेश धस

### सत्ताधारी पक्षाचे आमदार असूनही सुरेश धस यांचा घणाघात

आष्टी (प्रतिनिधी)

गेल्या काही वर्षात बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था धाब्यावर बसवण्यात आली असून गोरगरिबांच्या लेकराचा दिवसा ढवळ्या निर्घृणपणे खून करण्यात आला असून..त्यामुळे मानवतेचे धिंडवडे निघाले आहेत.. बीड जिल्ह्यात काय करून ठेवले आहे ?

असा सवाल करत भारतीय जनता पार्टीचे आमदार सुरेश धस यांनी सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्र्यांनी याबाबत अत्यंत कठोर कारवाई करून या खून प्रकरणातील सर्व आरोपी, त्यांचे पाठीराखे, त्यांचे मार्गदर्शक (आका ) शोधून त्यांचेवर कठोर कारवाई करण्यासाठी अगोदर सीआयडी ऐवजी जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली विशेष तपासी यंत्रणा स्थापन करावी अशी मागणी केली परंतु याप्रकरणी उच्च पदस्थ काही व्यक्तींचा हात असल्याचे निष्पन्न झाल्यास जिल्हा पोलीस प्रमुख यांचे वर दबाव येऊ शकतो त्यामुळे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास यंत्रणा स्थापन करावी अशी मागणी केली..

मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनाची सविस्तर कहाणी कथन करताना स्वतःसह संपूर्ण सभागृह भावना विवश झाले असल्याचे दिसून आले केज तालुक्यातील मस्साजोग येथील अत्यंत गरीब घरातील लोकनियुक्त तरुण



सरपंचाची क्षुल्लक कारणावरून निर्दयपणे हत्या केली आहे यापुढे अशा प्रकारच्या गोरगरीब लेकरांचे खून होऊ नयेत म्हणून या प्रकरणातील प्रत्यक्ष गुन्हेगार आणि त्यांच्या सूत्रधारावर कायम जरब बसेल अशी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे असे संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील घटनाक्रम सांगताना अत्यंत आक्रमक आणि धाडसी वृत्ती बद्दल प्रसिद्ध असणारे आमदार सुरेश धस हे देखील हेलावून घेण्याचे पाहायला मिळाले त्याचबरोबर संपूर्ण सभागृहातील सदस्य देखील हा वृत्तांत ऐकून गलबलून गेल्याचे दिसून येत होते

पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, मस्साजोग येथील तरुण सरपंच हा भारतीय जनता पार्टीचा बूथ प्रमुख म्हणून काम करत होता केजच्या आमदार नमिता मुंदडा यांच्यासाठी त्याने काम केले आहे अत्यंत गरीब घरातील हा तरुण तिसऱ्यांदा सरपंच झाला आहे तीन वेळा आमदार होणे सोपे आहे परंतु तीन वेळा सरपंच होणे सोपे नाही अवादा या

पवन ऊर्जा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना गेल्या दोन महिन्यापूर्वी बीड जिल्ह्यातील एका तालुक्यामध्ये बोलवून घेऊन त्यांना दोन कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती त्यातील काही रक्कम देण्यात आली होती आणि उर्वरित

(उर्वरीत पान २ वर)

## २५ जानेवारीपर्यंत आरक्षण न दिल्यास सळो की पळो करणार

### मनोज जरांगेंचा सरकारला इशारा

बीड / प्रतिनिधी

मराठा आंदोलन मनोज जरांगे यांनी आज पुन्हा एकदा मराठा आरक्षण प्रश्नावरून सरकारला इशारा दिला आहे. २५ जानेवारीपासून मराठा आरक्षणासाठी पुन्हा एल्गार पुकारणार असल्याचे जरांगे यांनी सांगितले. २५ जानेवारीपर्यंत आरक्षण दिले नाही, तर सरकारला सळो की पळो करून सोडणार, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. तुम्ही सत्तेत असाल, बलाढ्य असाल मात्र मराठ्यांपुढे सत्ता टिकत नाही, हे तुम्हाला २५ जानेवारीला दिसून येईल, असेही ते म्हणाले.



मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारला २५ जानेवारीपर्यंत अल्टिमेटम दिला आहे. ते आज बीड दौऱ्यावर असताना बोलत होते. यावेळी त्यांनी संतोष देशमुख हत्याप्रकरणावरूनही सरकारला धारेवर धरले. राजकीय नेत्यांच्या दबावामुळे पोलिस आरोपीला पकडत नाहीत का? अशी शंका त्यांनी यावेळी उपस्थित केली.

## समाजसेवेची समई सतत तेवत ठेवण्यासाठी आळंदीत संत पूजन कार्यक्रमाचे आयोजन

### केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उदघाटक म्हणून उपस्थित राहणार

वडवणी (प्रतिनिधी)

अखिल भारतीय मराठा महासंघ व जगद्गुरु तुकाराम महाराज सामाजिक, अध्यात्मिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीक्षेत्र.आळंदी येथे राज्यातील संत महंत, ज्येष्ठ किर्तनकार, संत साहित्याचे अभ्यासक, फडकरी, वारकरी शिक्षण संस्थाव्दारा ज्ञानदान करणाऱ्या गुरुजन या सर्वांचे संत पूजन तथा सेवा गौरव समारंभ दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी २ ते ६ यावेळेत वै.गोविंद महाराज केंद्रे संस्थापित श्री.ज्ञानेश्वरी मंदिर याठिकाणी संपन्न होत असून संत पूजनास उदघाटक म्हणून केंद्रिय राज्यमंत्री ना.मुरलीधर आण्णा मोहोळ व माजी केंद्रिय मंत्री जयसिंगराव गायकवाड पाटील यांच्या उपस्थितीत व शुभहस्ते संपन्न होणार आहे.

यावेळी व्यासपीठावर आशिर्वाद देण्यासाठी शांतीब्रम्ह मारुती महाराज कुरेकर बाबा, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त योगी निरंजननाथ, डॉ.भावार्थ देखणे, श्री.विठ्ठल रुक्मिणी समिती पंढरपूरचे ह.भ.प.गहिनीनाथ औसेकर, जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे वंशज बापूसाहेब मोरे देहूकर, ह.भ.प.संजय मोरे देवकर अध्यक्ष फडकरी दिंडीकरी समाज संघटना महाराष्ट्र राज्य, ज्ञानेश्वर माऊली जन्म संस्थान आपेगांव तालुका पैठणचे अध्यक्ष ह.भ.प.ज्ञानेश्वर दादा कोल्हापूरकर, मुक्ताई संस्थानाचे ह.भ.प.रविंद्र महाराज हरणे, संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.नारायण जाधव, भागवत महाराज जळगांवकर, स्वानंद सुख निवासी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.संदिपान महाराज हासेगांवकर, समारंभाचे स्वागताध्यक्ष ह.भ.प.चैतन्य महाराज कबीर, अमृत आश्रम स्वामी नवगण राजुरी संतभूमी संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.मधुसूदन पाटील, ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज मोरे देहूकर अध्यक्ष श्रीसंत तुकाराम महाराज संस्थान देहू, गुरुनाम गुरु बंकट स्वामी महाराज संस्थान पंढरपूर आळंदी नेकनुरचे महंत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, मुकुंदराज संस्थानाचे अध्यक्ष ह.भ.प.किशन महाराज पवार, आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे सर्व अध्यापक, शिष्यगण आदी उपस्थित राहणार आहेत. या समारंभाचे प्रयोजन हेतू स्पष्ट करतांना बब्रुवान शेंडगे पाटील यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात पुढे नमूद केले आहे की, अखिल भारतीय मराठा महासंघ ही सामाजिक संघटना राजश्री शाहू महाराज यांच्या आशिर्वादाने इसवी सन १९०० साली तत्कालीन समाज व्यवस्थेच्या विरुध्द बहूजन समाजाला एकत्र करुन समाज ज्ञानी बनविणे, अज्ञान दूर करुन सशक्त समाज करणे, भारताच्या स्वातंत्र्यासाठी जनजागृती

(उर्वरीत पान २ वर)

## माजी आ.भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली उद्या कार्यकर्त्यांची चिंतन बैठक



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील कार्यकर्त्यांची चिंतन बैठक शनिवार दिनांक २१ डिसेंबर रोजी आष्टी येथे होणार आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले होते. शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांनी निवडणूकी पुर्वी प्रत्येक गांव, वाड्या, वस्त्यांवर जात संपुर्ण मतदारसंघ पिंजून काढला. लोकाग्रहास्तव त्यांनी अपक्ष उमेदवारी दाखल करीत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. सर्व ताकदीनिशी निवडणूक लढविली. कार्यकर्त्यांनी देखील जिवाचे रान करीत जिंकण्यासाठी प्रयत्न केले परंतु अपयश आले. आपला पराभव कसा झाला, आपण कोठे कमी पडलो, प्रचारयंत्रणेत आपण कमी पडलो का ? यावर चिंतन आणि विचार मंथन करण्यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी दिनांक २१ डिसेंबर रोजी आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात सकाळी साडे अकरा वाजता कार्यकर्ता चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी आष्टी, पाटोदा, शिरुर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. अजयदादा धोंडे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.


## शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल

अॅडव्हान्स अॅनोरेक्टल (पाईल्स )लेझर सेंटर

डॉ.प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S. M.D.
(Anaesthesia)
भुलतज्ञ

डॉ.मीरा प्र.ढाकणे
(नागरे)
B.A.M.S. M.S.(Shalya)
मुळव्याध, भगंदर
व लेझर सर्जन

आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच

महिला मुळव्याध तज्ञ

डॉ.सौ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)

महिला रूगणांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील.

मुळव्याध करीता विशेष उपचार

- लेजर उपचार
- इंजेक्शन उपचार
- ऑपरेशन उपचार
- क्षारसुत्र उपचार
- मुळव्याध, भगंदर
- फिशर
- मलबध्दता
- संडासवाटे रक्तस्त्राव होणे
- बस्ती उपचार
- स्तनातील गाठी
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
- स्तनामध्ये पु.होणे
- मोस, जामखीळ व कुरूप काढणे
- गर्भावस्था किंवा प्रसुतीनंतर
- मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार

हॉस्पिटलचा पत्ता

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डी.पी.रोड
बसस्टँडच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड
मो.क्र.9623079009


## शेख तय्यब यांच्या एक महिन्यात २५ जिल्ह्यांना भेटी

### मराठवाड्यापाठोपाठ विदर्भाचा केला दौरा

**मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा प्रचार आणि प्रसार करा**
**शैक्षणिक कर्जाला महत्त्व द्या,लोकांची अडवणूक करू नका : शेख तय्यब यांच्या व्यवस्थापकांना सूचना**



बीड (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील जिल्ह्यांचा दौरा केल्यानंतर मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी विदर्भातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, वर्धा, गडचिरोली सह अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, येवतमाळ येथील जिल्हा कार्यालयांना भेट देत तेथील व्यवस्थापकांसोबत बैठक घेत कामकाजाचा आढावा घेतला. उपस्थित व्यवस्थापकांना महामंडळामार्फत मिळणार्या वेगवेगळ्या योजनांबाबत जनजागृती करण्याबाबत आणि विशेष करून शैक्षणिक कर्जासाठी लक्ष देण्याबाबत सूचना केल्या. विदर्भातील बहुतांशी कार्यालयात कर्मचार्यांना काही अडचणी आहेत याबाबतच्या तक्रारी कर्मचार्यांनी केल्या. त्यावर शेख तय्यब यांनी महामंडळाचे एम.डी.मगदूम साहेब यांच्यासोबत चर्चा करून त्या समस्या सोडविण्याबाबत सूचना केल्या. शेख तय्यब यांची मौलाना आझाद अल्पसंख्यांक

(उर्वरीत पान २ वर)

## अमित शहा, राजीनामा द्या !

बीड ।प्रतिनिधी

तुम्हास नमस्कार कसा करावा, शेवटी तुमच्या पोटातले ओठात आले. आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी एवढी घृणा का आहे. संसदेत म्हणालात, आता फॅशन आली आहे, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर म्हणण्याची असही म्हणालात की इतक्यावेळा ईश्वराचे नाव घेतले असते तर सात जन्मापर्यंत स्वर्ग मिळाला असता. तुमच्या या वक्तव्याचा मी निषेध करते व धिक्कार करते.

अमित शहा, तुम्हास डॉ. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर माहित आहेत का ? समजलेत का ते तुम्हाला ?. अहो त्यांनी जगातल्या घटनांचा अभ्यास करुन देशाला घटना दिली. त्या घटनेच्या चौकटीत राहुन तुम्ही निवडणुक लढवली व खासदार झालात. आता गृहमंत्री आहात, घटना वाचली का तुम्ही कधी ? वाचुही नका. तुम्हास समजणार नाही. तडीपार ना तुम्ही. लायकी नसताना गृहमंत्री झालात. पंतप्रधान आणि तुम्ही सारखेच.



आम्हाला सातजन्म स्वर्ग नको आहे. आम्हाला लोकशाही हवी आहे. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य हवे आहेत. नोकऱ्या हव्या आहेत. सामाजिक समता हवी आहे. देशाची अखंडता, सामाजिक एकात्मता हवी आहे. धर्मनिरपेक्षता हवी आहे. तुम्ही तर हिंदु खतरमें है म्हणता. पुन्हा एक है तो सेफ है म्हणता, देश सुरक्षीत हाथो में है म्हणता. हिम्मत असेल तर मणिपुरला जा, बघा शांतता प्रस्थापित करता येते का ? तुम्हाला सात जन्माचा स्वर्ग मिळेल.जमले तर बांग्लादेशात जे हिंदुवर अन्याय होत आहेत, त्यासाठी काही करता आले तर बघा.म्हणे तुमच्या विश्वगुरुने युक्रेनचे युध्द संपवले, मणिपुरसाठी काही करता आले तर बघा, पण तुम्ही करणार नाहीत.तुम्ही संसदेत असेही म्हणालात की, अल्पसंख्यांकांना आरक्षण देण्याची धडपड विरोधी करत आहेत. नरेंद्र मोदींचा दर्गामध्ये चादर चढवताना फोटो व्हायरल झाला आहे. मग हे नाटक कशासाठी ?घटना बदलायला निघालेले

(उर्वरीत पान २ वर)

## अल्पसंख्याक समितीवर अशासकीय सदस्य नोंदणसाठी अर्जाचे आहवान

बीड (प्रतिनिधी)

अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्यांकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला असून जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीवर शासकीय अधिकारी त्या त्या जिल्ह्याचे राज्यसभा, लोकसभा तसेच विधानसभा सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या ३ नामवंत संस्थाचे अशासकीय प्रतिनिधी समितीवर सदस्य असणार आहेत.

अल्पसंख्यांकासाठी काम करणाऱ्या ३ नामवंत स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी यांचे नामनिर्देशन शासनास सादर करण्याकरिता शासन निर्णयानुसार व १५. ४. २०१७ मध्ये दिलेल्या दिशानिर्देशानुसार अनुसरून इच्छुकांनी अर्ज

(उर्वरीत पान २ वर)


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय

# रसायनांची सूडयात्रा!

...आता रशियाच्या या अस्त्र-कार्यक्रमाचे प्रमुख इगॉर किरिलॉव यांच्या मृत्यूनंतरही रशियाच्या कारवाया थांबणार नाहीत...

याआधी दार्या दुगिना हिच्या मोटारीखाली स्फोट होऊन ती मारली गेली. तिचे वडील क्रेमलिनचे, म्हणजे अर्थातच रशियन अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे समर्थक. पुतिन यांचा आणखी एक समाजमाध्यम समर्थक व्लादे तातार्स्की याला सत्कारात दिल्या गेलेल्या लहानशा मूर्तीचा स्फोट झाला आणि त्यात तो गेला. इलिया कीवा हा पुतिन समर्थक युक्रेनी नेता. तो त्याच्या घराजवळ मारला गेला. सर्जेई येव्सिकॉव हे एका रशियन तुरुंगाचे प्रमुख. तेही असेच ठार झाले. त्यांच्याही मोटारीखाली स्फोट झाला. मिखाइल शात्स्काय हा रशियाचा क्षेपणास्त्रतज्ज्ञ. रशियाच्या क्षेपणास्त्रांच्या आधुनिकीकरणाचे श्रेय त्याचे. तोही अलीकडेच स्वत:च्या घराजवळ मारला गेला. या मालिकेतील ताजे मरण इगॉर किरिलॉव यांचे. ही बडी असामी रशियाच्या आण्विक, रासायनिक आणि जैविक अस्त्र व्यवस्थेची प्रमुख. पुतिन यांचा चेहरा असे त्यांचे वर्णन केले जात असे. ते मॉस्को येथील आपल्या घरातून कार्यालयात जाण्यास मोटारीत बसणार तर शेजारच्या दुचाकीत स्फोट झाला आणि किरिलॉव मारले गेले. त्यांचा सहकारीही त्यांच्या समवेत ठार झाला. त्यांच्या हत्येची जबाबदारी युक्रेनच्या गुप्तहेर संघटनेने घेतली असून युक्रेनकडून अशा पद्धतीने मारली गेलेली किरिलॉव ही आतापर्यंतची रशियाची सर्वात बडी असामी. यातील महत्त्वाचा भाग असा की युक्रेनच्या हेरांनी किरिलॉव यांस अगदी 'घरमे घुसके' मारले. यातून युक्रेनच्या गुप्तहेर यंत्रणेच्या क्षमतेचा अंदाज येतोच. पण त्याचबरोबर रशियन यंत्रणा केवळ आकाराने भव्य असल्या तरी आतून त्या पोखरल्या गेल्या असल्याचाही संदेश जातो. या किरिलॉव यांच्या हत्येबाबत दु:ख वा सहानुभूती व्यक्त करावी असे काहीही नाही. पुतिन ज्याप्रमाणे आपल्या एकेक विरोधकांचा काटा काढतात त्याच थंडपणे त्यांच्या सहकाऱ्यांसही मरण येत असून यातील किरिलॉव यांच्यावर तर जागतिक निर्बंध होते. याचे कारण किरिलॉव करत असलेले उद्योग.

ते रशियाच्या अत्यंत घातक अशा रासायनिक आणि जैविक संहार अस्त्रांचे नियंत्रक होते. ताज्या युक्रेन युद्धात त्यांनी जागतिक पातळीवर बंदी घालण्यात आलेल्या 'क्लोरोपिक्रीन' या जीवघेण्या रसायनास्त्राचा वापर प्रतिपक्षाविरोधात केल्याचा आरोप आहे. त्या संदर्भात अमेरिकेसकट अनेकांनी पुरावे दिले. 'क्लोरोपिक्रीन' हा एक तेलकट चिकट द्रव असून त्याचा वापर पहिल्यांदा पहिल्या जागतिक युद्धात केला गेल्याची नोंद आढळते. तेव्हापासून त्याच्या युद्धजन्य वापरावर बंदी आहे. पण तरीही रशियाने युक्रेनविरोधात हे रसायनास्त्र वापरले.

# व्यवसायिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्थसहाय्याबाबत

बीड (प्रतिनिधी)

सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड कार्यालय मार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वस्तीगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना घरभाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून सदर योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत असून त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी ह्ीींिं://हारी.ारहरळीं.ास या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. सदर योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत दि. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाइन पद्धतीने विहिध मुदतीत अर्ज करण्याच्या आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

# स्वानंद सार्वजानिक वाचनालय गांवचे भुषण तर राज्यासाठी मार्गदर्शक - डॉ.कमलाकर राऊत

केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय हे आनंदगांव ता.केज.जि.बीड चे भुषण तर संपूर्ण महाराष्ट्र राज्या साठीमार्गदर्शकअसल्याचे प्रतिपादन साहित्यीक डॉ. कमलाकर राऊत यांनी मार्गदर्शन समयी आपले मत व्यक्त केले.स्वानंद सार्वजनिक वाचनालयात दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ रोजी ग्रंथप्रदर्शन, काव्यवाचन,व्याख्यान आदी कार्यक्रम घेण्यात आले.सरदार



वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.या प्रसंगी काव्यवाचन करून व्याख्यान देताना ते बोलत होते.दुसरेकवी सेवानिवृत्त प्राध्यापक,कवी प्रा. माणीकरावआनंदगांवकर हे प्रमुख पाहुणे म्हणून व कवी म्हणूनही उपस्थित होते.यावेळी त्यांनी स्वतः लिहिलेल्या विविध कवितांचे वाचन केले व उपस्थित सर्व महिला, युवती,पुरुष,युवक,वाचक यांना त्यांच्या काव्य संग्रहाच्या प्रति भेटदिल्या. त्यांनी अतिशय सुरेख काव्यवाचन केले.सौ. जयश्री दशरथ गायकवाड यांनीही छोटेखानी व्याख्यान दिले.शिवाजी नाना गायकवाड,रविंद्र गायकवाड(पेण्टर),गोविंद गायकवाड,मिराता शिवदास तट यांची प्रमुख उपस्थिती होती.अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,माजी प्राचार्य,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, सुप्रसिद्ध वक्ते,व्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.ग्रंथप्रदर्शन, काव्यवाचन,व्याख्यान इत्यादी कार्यकमाला महिला,युवती,युवक,जेष्ठ नागरीक,विधार्थी यांची लक्षणीय उपस्थिती होती.

यावेळी साहित्यीक,कवी डॉ.कमलाकर राऊत, साहित्यीक,कवी प्रा. माणीकरावआनंदगांवकर यांचा ग्रंथालयाच्या वतीने शाल,श्रीफळ,पुष्पहार फेटा बांधुन सत्कार करण्यात आला.

---

क्रमांक.२०२३/संकीर्ण/जन्म - मृत्यु नोंदणी /कावि- २९४
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार धारुर
दिनांक. ०६.१२.२०२४

## जाहिरनामा

**जन्म - मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये सर्व जनतेस मौजे, सोनीमोहा ता. धारुर जि. बीड यांना जाहिर केले जाते की, अर्जदार नामे श्री. तोंडे माणिक मनोहर रा. सोनीमोहा ता. धारुर जि. बीड यांचे आजोबा नामे मनोहर विठोबा तोंडे यांच मृत्यु दिनांक- ०१/०२/१९८५ रोजी मौजे, सोनीमोहा ता. धारुर जि. बीड येथे झाला असुन अर्जदारांनी सदरहु मृत्युची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराचे आजोबाचे कायदेशीर मृत्युचे दिनांक कायदेशीर न्वहे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासुन १५ दिवसाच्या आत त्याने हया कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार हयांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे मृत्युचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक- ०६ /१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
कार्यकारी प्रकारा तहसीलदार धारुर

---

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा गेवराई, जि.बीड
येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९४० / २०२४
सुमित्रा व ईतर विरूध्द निरंक
(मार्फत - बी. के. निकाळजे गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे यमाजी आप्पा डोंगरे हे दिनांक ०६/१०/२०२४ रोजी मौजे सेलु ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १. सुमित्रा भ्र. यमाजी डोंगरे वय ७३ वर्षे धंदा घरकाम रा. सेलु, ता. गेवराई, जि. बीड अर्जदार क्रं. २. विलास पि. यमाजी डोंगरे वय ५६ वर्षे, धंदा नौकरीरा. कालीकानगर माजलगांव, ता. माजलगांव, जि. बीड अर्जदार कं. ३. सिंधु भ्र. शहादेव तुपारे वय ५८ वर्षे, धंदा घरकाम रा. वारोळा, ता. माजलगांव, जि. बीड अर्जदार क्रं. ४. शांता भ्र. सुनिल इनकर वय ५४ वर्षे, धंदा घरकाम रा. क्रांती चौक पोलीस स्टेशन संसार नगर औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद अर्जदार कं. ५. धाईजे ललिता भ्र. शिवाजी वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. प्रबोधनगर आ. चिंचगव्हाण पो. माजलगांव, ता. माजलगांव, जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मयत नामे यमाजी आप्पा डोंगरे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १८/०१/२०२५

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई**

**आदेशावरुन,**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई**

---

# प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे यांच्या गायनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन केल्या बद्दल जाहीर सत्कार संपन्न

उमरेड/प्रतिनिधी

उमरेड तालुक्यातील, सेडेश्वर आदिवासी गोंड गोवारी समाज संघटना, सेडेश्वर,बोरीमजरा, आमघाट,चिखलधोकडा, मसाला,सावंगीच्या वतीने ११४ शहीद आदिवासी गोंड गोवारी बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजलीअर्पण करण्यात आली त्यानंतर समाज प्रबोधन कार्यक्रम दिनांक१६ डिसेंबर २०२४ सोमवारी सायंकाळी आठ ते बारा वाजेपर्यंत शहीद आदिवासी गोंड गोवारी स्मारक शेडेश्वर तालुका उमरेड समाज प्रबोधन कार्यक्रम मोठ्याउत्साहात पार पडला.याकार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दौलतराव राऊत,कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक किशोर चौधार, भास्करराव राऊत, शांताराम राऊत,चंद्रकला सोनवणे,बाळू वाघाडे,रवी वाघाडे यांची प्रमुख उपस्थिती उपस्थिती होती ग्रामपंचायतच्या सरपंच मंगला राऊत,ग्रामपंचायत सदस्य सावंगीखुर्द,शितल सहारे,चंद्रभान सहारे, ग्रामपंचायत सरपंच चतोडा,महादेव मुरखे, पोलीस पाटील बोरी मजरा,प्रमोद यसनसुरे, दिलीप राऊत,शिवाजी कांबळे,ज्ञानेश्वर राऊत,



प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे,शाहीर गणेश मेश्राम,इत्यादी मान्यवरां च्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून, ११४ शहीद आदिवासी गोंड गोवारी बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, याप्रसंगी रामटेक तालुक्यातील किरणापुर येथील विदर्भ संघटक प्रमुख,महाराष्ट्र शाहीर परिषद पुणे,सुप्रसिद्ध गायक प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे यांच्या गायनाच्या माध्यमा तून समाज प्रबोधन, क्रांतीसुर्य जननायक बिरसा मुंडा यांचे विज्ञानवादी विचार मांडून अन्याय झाला फार एक वीर पाहिजे या देशाला बिरसा तुझे नाव पाहीजे, जंगलाचे राजे आम्ही, काळीज आमचे वाघाचे, बिरसा भगवानचे भक्त आम्ही,नाते आमचे रक्ताचे जल जंगल और जमीन का नारा दिया,अंग्रेजी लगान के विरुद्धआंदोलन किया,मुंडाओ को संघटित कर,उनकी चेतना जगाई अंग्रेजी को हटाकर अपने ताकद दिखाई असेसमाज प्रबोधन केले व त्यांच्या जाहीर सत्कार करण्यात आला.याप्रसंगी शाहीर गणेश मेश्राम,आकाश पडोळे,सामाजिक कार्यकर्ता शिवाजीकांबळे भीम शाहीर प्रदीप कडबे, डायस बोटरे,दिनेशराऊत, प्रदीप राऊत,मारोतीसहारे मोरेश्वर बोटरे,सामाजिक कार्यकर्ता ज्ञानेश्वर राऊत, गोविंदभोंडे,धनराजराऊत,राजेंद्र बोटरे,दादाराव बोटरे,वसंतराव बोटरे, इत्यादी आदिवासी गोंड गोवारी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---







# भाजपाचे जेष्ठ नेते रमाकांत बापु मुंडे यांनी नुतन मंत्री व आमदार यांना दिल्या शुभेच्छा

केज/प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे जेष्ठनेते श्री.रमाकांत मुंडे यांनी नागपूर येथे भाजपा च्या राष्ट्रीय नेत्या तथा ना. पंकजाताई मुंडे तसेच त्यांचे जिवलग मित्र मा. मंत्री संजयजी बनसोडे साहेब,आ.बाबासाहेब पाटील अहमदपूर,व ना. आकाशजी फुंडकर यांची कॅबिनेटमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले तसेच आमदार सौ.नमिताताई मुंदडा,अक्षय भैया मुंदडा यांचे अभिनंदन केले अन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. नागपुर येथे विधानसभेचे हिवाळी अधिवेशन चालू असुन सर्व मंत्री,आमदार नागपुर येथे वास्तव्याला आहेस त्यामुळे रमाकांत बापु मुंडे यांनी नागपुर येथे जाऊन त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. त्या बद्दल रमाकांत बापु मुंडे यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

---

पान १ वरून...

**समाजसेवेची समई सतत ...**

करणे यासाठी स्थापन झाली. या संस्थेचे जुने नाव क्षत्रिय मराठा न्याती समाज या नावाने तत्कालीन सामाजिक पुढारी देशभर सभा संमेलन घेवून शिक्षणाचा पुरस्कार करीत असत. बहूजन समाजाने शिकावे सुसंस्कृत व्हावे हीच भावना तत्कालीन नेत्यामध्ये होती. स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्यापासून ते संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत अनेक आंदोलनात क्षत्रिय मराठा न्याती समाजाचे नेते होते. १९७८ साली क्षत्रिय मराठा समाजाचे भव्य अधिवेशन मुंबई येथे पार पडले होते. या अधिवेशनाला देश विदेशातून समाजबांधव हजर होते. याच अधिवेशनात आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या सर्व समाजाला सवलती द्या अशी मागणी करण्यात आली. १९८१ मध्ये क्षत्रिय मराठा न्याती समाजाचे नाव बदलून अखिल भारतीय मराठा महासंघ करण्यात आले आणि माथाडी कामगार नेते स्वर्गीय आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली आरक्षणाच्या मागणीने पुन्हा रान पेटले. स्वर्गीय अण्णा साहेबांच्या अचानक जाण्याने समाज पोरका झाला. अशा बिकटप्रसंगी स्वर्गीय शशिकांत उर्फ आप्पासाहेब पवार यांनी महासंघाची धुरा साभाळली सतत ५० वर्ष आरक्षणाची लढाई लढता लढता दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. शशिकांत उर्फ आप्पासाहेब यांच्या अध्यक्ष कार्यकाळात महाराष्ट्रातून अनेक जिल्ह्यातून त्यांना समर्थ साथ दिली. यामध्ये कै.प्रभाकर शिंदे, कै.किशनराव वरखिंडे, कै.सुरेश माने, कै.क्षत्रिय महासभेचे प्रेम पालसिंह, मराठवाड्यातून परळीचे स्वर्गीय रावसाहेब काळे, स्वर्गीय बाबासाहेब राऊत, स्वर्गीय बाबासाहेब पिंगळे, विदर्भवीर अण्णासाहेब पाटील येरळीकर, स्वर्गीय नागोराव लोमटे, स्वर्गीय प्रताप माणिकराव मस्के, स्वर्गीय रावदत्ता कदम, आमदार भाई जगताप कामगार नेते, दिलीप दादा जगताप विद्यमान अध्यक्ष, संतोष नानवटे, पुण्यातून स्वर्गीय प्रभाकर दुर्गे, परभणी येथून ह.भ.प.बालासाहेब मोहिते, विदर्भातून राजेंद्र कडू, ह.भ.प.रविंद्र महाराज हरणे, दशरथ पिसाळ, अशोक हिंगे, बब्रुवान जगन्नाथ शेंडगे पाटील, शंकरराव आंधळे, रमेश पोकळे, सुहास पाटील, सुरेश फावडे, सुबराव सोळंके, दादासाहेब शिंदे पाटील, संतोष डावकर, यासह ज्ञात अज्ञात कार्यकर्त्यांनी भगव्या ध्वजाचे पाईक म्हणून आप्पासाहेब यांच्याबरोबर लढत राहिले. यामध्ये स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी सुध्दा मराठा महासंघासाठी कार्य करुन नंतर शिवसंग्राम नावाची वेगळी संस्था निर्माण करुन ते मराठा महासंघाच्या बाहेर पडले.

शशिकांत उर्फ आप्पासाहेब यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २४ व २५ डिसेंबर २००० या साली मराठा महासंघाचा शतक महोत्सव कार्यक्रम शिवाजी पार्क मुंबई येथे गगनगिरी महाराजांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला. याप्रसंगी अनेक संत मंडळी उपस्थित होते. आतापर्यंत महासंघाने अनेक चढउतार पाहिले, अनेक संघर्षातून जावे लागले. परंतू साधुसंत, महात्मे यांच्या आशिर्वादाने १२५ वे वर्ष साजरी करण्याचे भाग्य आम्हास लाभले ४८ वर्षांनंतर शशिकांत उर्फ आप्पासाहेब यांच्यानंतर दिलीप दादा जगताप यांना अध्यक्षपदाचा मान प्राप्त झाला. त्यांच्याच नेतृत्वाखाली मराठा महासंघ पुढील शंभर वर्ष समाजसेवेत कार्यरत राहावा यासाठी श्रीक्षेत्र.आळंदी देवाची येथे संत पूजन तथा सेवा गौरव समारंभ संपूर्ण होत आहे. जेणेकरुन समाजसेवेची समई सतत तेवत राहावी यासाठी ह.भ.प., साधू, संत, महंत, समाजसेवक यांचे आशिर्वाद लाभावे हिच अपेक्षा अखिल भारतीय मराठा महासंघ शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शशिकांत पवार यांच्या स्मरणार्थ मराठा भूषण पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. विद्यमान अध्यक्ष दिलीप दादा जगताप यांना समर्थ साथ देण्यासाठी गुलाबराव गावडे राष्ट्रीय कार्याध्यक्ष, संतोष नानवटे राष्ट्रीय उपाध्यक्ष, संभाजी दहातोंडे राष्ट्रीय सरचिटणीस, श्रीरंग बरगे राष्ट्रीय कोषाध्यक्ष, दशरथ पिसाळ राष्ट्रीय चिटणीस, दिलीप धंदरे राष्ट्रीय संपर्कप्रमुख, जगदुरु तुकाराम महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष बब्रुवान शेंडगे पाटील हे सर्वजण आपापल्या विभागात झंझावती दौरा करुन संत महंत समाजसेवक यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सतर्क असून मराठवाड्यातही या कार्यक्रमाची लगबग उत्साह दिसून येत आहे. परभणीचे विभागीय अध्यक्ष धाराजी भुसारे, जिल्हाध्यक्ष लक्ष्मण मोहिते, बीड जिल्ह्याचे अध्यक्ष गणेश नाईकवाडे कार्यरत असून या समारंभास संगीत क्षेत्रातील रघुनाथ खडाळकर गुरुजी, संगीत अलंकार सोळुंके गुरुजी, कल्याण गायकवाड गुरुजी, उध्दव बापू शिंदे, गायत्री गायकवाड यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी.डी.भोसले नगरसेवक, संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालयाचे अजित वडगावकर माजी नगर उपाध्यक्ष आनंदकुमार कुराडे पाटील, अध्यात्मिक राज्य आघाडी प्रमुख संजय घुंडरे पाटील हे अथक परिश्रम घेत असून या सोहळ्याचे सुरेख असे सुत्रसंचालन प.पू.संतोषानंद शास्त्री श्रीमद् भागवत कथा एवं राम कथेचे सरस प्रवक्ता हे करणार आहेत.

**अमित शहा,...**

तुम्ही आता घटनेपुढे मान झुकवता. किती नाटके करणार ? दररोज लोकशाही पायदळी तुडवताय. राजकीय पक्षांची तोडफोड करणे, नेत्यांची घरे फोडणे, याला काय म्हणयाचे ?एक देश एक निवडणुक

पान १ वरून...

हे विधेयक तुम्ही आणले आहे. हकूमशाहीच्या दिशेने तुमची उघड वाटचाल सुरु आहे.बाकी हे सगळे तुम्हाला सांगुन काय उपयोग म्हणा! पालथ्या घड्यावर पाणी !! तुम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर काय समजणार म्हणा. डॉ. आंबेडकर हे भारतरत्न, तुम्ही तर तडीपार !अमित शहा तुम्ही समजता काय स्वतःला. तुम्ही फक्त डॉ. बाबासाहेबांचा नाही तर देशाचा अपमान केला आहे. जराही तुमच्यात शिल्लक असेल तर देशाची माफी मागा,गृहमंत्री पदाचा राजीनामा द्या.!

शब्दांकन...
ॲड. उषाताई दराडे,
माजी आमदार
भ्र.ध्व ९०११५२११११

**अल्पसंख्याक समितीवर ...**

प्रस्ताव दिनांक २६ डिसेंबर २०२४ पर्यंत विहित नमुन्यात सादर करण्याचे आवाहन, जिल्हा नियोजन कार्यालय बीडतर्फे करण्यात आले आहे.

इच्छुक उमेदवाराकडून सादर करण्यात येणाऱ्या अर्ज प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. नाव, पत्ता, जन्म दिनांक, व्यवसाय, शिक्षण, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी .अल्पसंख्यांकासाठी काम करणा-या नामवंत समाजसेवी संस्थाचे प्रतिनिधी असल्याचे प्रमाणपत्र.( संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा स्वाक्षरीने अधिकृत) अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी करण्यात आलेल्या सामाजिक कार्याची माहिती. जिल्हास्तरावर अल्पसंख्यांक कल्याण समितीवर निवड झालेल्या प्रतिनिधींना, सदस्यांना कोणतेही मानधन व बैठक भत्ता देय होणार नसल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकात नमूद केले आहे.

**शेख तय्यब यांच्या एक...**

आर्थिक महामंडळाच्या संचालक पदावर नियूक्ती झाल्यापासून त्यांनी जवळपास २५ जिल्हा कार्यालयाला भेटी दिल्या आहेत.

संपादक शेख तय्यब यांची गेल्या एक महिन्यापूर्वी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालकपदी नियूक्ती झाली. त्याबरोबर विधानसभेची निवडणूक लागल्याने आचारसंहिता लागली. आचारसंहिता संपताच शेख तय्यब यांनी मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, नांदेड, बुलढाणा आदी जिल्ह्याचा दौरा करत तेथील महामंडळाच्या कार्यालयाला भेटी देत महामंडळाच्या विविध योजनांचा प्रसार आणि प्रचार करण्याबाबत सूचना दिल्यानंतर शेख तय्यब हे विदर्भाकडे गेले. नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यातील महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकासोबत आढावा बैठका घेतल्या. जिल्हा व्यवस्थापक नफीस शेख, मोहम्मद, ओवेस अन्सारी, तौफीक अन्सारी यांच्यासोबत चर्चा करून शैक्षणिक कर्जावर प्रामुख्याने लक्ष देण्याबाबत सूचना केली. त्याचबरोबर जनजागृतीला प्रामुख्याने प्रोत्साहन देण्याचे त्यांनी म्हटले. यावेळी काही व्यवस्थापकांनी कार्यालयामध्ये येणार्या अडचणीबाबत शेख तय्यब यांच्यासमोर गार्हाणे मांडले. त्यावर शेख तय्यब यांनी तात्काळ महामंडळाचे एम.डी. मगदूम साहेब यांच्यासोबत बोलून तात्काळ समस्या सोडविण्याबाबत सूचना केल्या.

पुढे शेख तय्यब हे अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, येवतमाळ येथील कार्यालयांमध्ये प्रत्यक्षपणे भेट देत येवतमाळचे जिल्हा व्यवस्थापक मुकूंद कठाणे, अमरावतीचे फरजान परवीन इनामदार, अकोल्याच्या ज्योती भगत, केशव घाटे, बुलढाण्याचे ज्योती हिवाळे, शेख साबेर यांच्यासोबत बैठक घेत लाभार्थ्यांना मदत करणे, लाभार्थ्यांच्या आलेल्या फाईल किरकोळ कारणासाठी आडून न धरणे, जे काम आले आहे ते जलदगतीने तात्काळ करणे याबाबतच्या सूचनांसह महामंडळाच्या विविध योजना विषयांची जनजागृती करण्याबाबत संबधीत व्यवस्थापकांनी सूचना केल्या. शेख तय्यब यांची मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक पदावर नियूक्ती झाल्यानंतर गेल्या दोन महिन्यांच्या कालखंडात शेख तय्यब यांनी २५ जिल्ह्यातल्या कार्यालयांना भेटी देत तेथील कामकाजाचा आढावा घेतला. त्याचबरोबर त्यांच्या समस्या जाणून घेत मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे कामकाज जलदगतीने करण्याबाबत व्यवस्थापकांसह एमडींना सूचना केल्या.

**बीड जिल्ह्यात..**

रकमेसाठी त्यांच्याकडे सतत मागणी होत होती या अवादा कंपनीच्या कार्यालयाकडे मस्साजोग येथील काही तरुण सुरक्षारक्षकाचे काम करतात शुक्रवार दिनांक ९ डिसेंबर रोजी केज तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष विष्णू चाटे यांनी सुदर्शन घुले, प्रतीक घुले, आणि इतर काही जणांना कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे पाठवले त्यावेळी गेटवर असलेल्या सुरक्षारक्षकाने अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन जावे असे सांगताच त्याला मारहाण करण्यात आली हा तरुण दलित घटकातील असताना त्याला जातीवाचक

पान १ वरून...

शिवीगाळ करण्यात आली आणि मारहाण करण्यात आली हे समजताच सरपंच संतोष देशमुख हे त्या ठिकाणी गेले आणि प्रकरण मिटवण्यासाठी प्रयत्न करत असता त्यांनाही मारहाण झाली त्यानंतर पोलिसांचे काही कर्मचारी आले आणि या तरुणांना घेऊन गेले दलित तरुणाला मारहाण झाल्याबद्दल जातिवाचक शिवीगाळ केल्याबद्दल ट्रॉसिटी कायद्यानुसार फिर्याद

देण्यासाठी हा सुरक्षा रक्षक गेला होता त्याचबरोबर अवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी देखील कार्यालयासमोर सुरक्षारक्षकाला मारहाण झाली याबाबत कंपनीतर्फे देखील फिर्याद देण्यात आली परंतु त्या दिवशीचे ठाणे अमलदार चार तास पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित नव्हते या दोन्ही फिर्यादी पोलिसांनी नोंदवून घेतल्या नाहीत कारण त्यावेळी पोलीस स्टेशन येथे विष्णू चाटे स्वतः येऊन पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधत होता त्यावेळी या पोलीस अधिकाऱ्यांना कोणाकोणाचे फोन आले ? याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी करत दलित तरुणाला आणि संतोष देशमुख यांना मारहाण करणाऱ्या सुदर्शन घुले, प्रतीक घुले, केदार आणि इतर दोन-तीन आरोपींवर थातुरमातुर अदखलपात्र गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ सोडण्यात आले

त्यानंतर शनिवार आणि रविवारी केजचे पोलीस उपनिरीक्षक भोसले हे सुदर्शन घुले यांना मोटार सायकल घेऊन फिरत होते त्यावेळी एका हॉटेलमध्ये संतोषच्या भावाची भेट झाली त्यांनी प्रकरण मिटवण्यासाठी संतोषला ठाण्यात पाठवून द्या असे सांगितले संतोष देशमुख त्यांच्या आते भावासह दिनांक ९ डिसेंबर रोजी केज पोलीस स्टेशन येथे गेले परंतु त्या ठिकाणी गेल्यानंतर प्रकरण मिटवायचे नाही असे समजल्यानंतर ते परत आले त्यानंतर भर राज्य रस्त्यावर टोल नाक्यावर त्यांचे अपहरण त्यांना अज्ञात ठिकाणी नेण्यात आले त्यांचे आते भावाने परत पोलीस स्टेशनमध्ये येऊन या घटनेची माहिती दिली आणि विष्णू चाटे यांना फोन करून माझ्या भावाला मारू नका अशी विनंती केली विष्णू चाटे यांना ३५ वेळा फोन केला त्यावेळी ते २० मिनिटात संतोष याला आणून सोडतो असे म्हणायचे परंतु चार तासाने त्याचा मृतदेह आढळून आला त्याचे डोळे लाईटरने जाळण्यात आले होते त्याच्या शरीरावर एक मिलिमीटर देखील जागा शिल्लक नव्हती इतक्या अमानुषपणे त्याला शरीरावर मारहाण करण्यात आली होती त्याने पाणी मागणी केली असता त्याला आणि पाणी देखील देण्यात आले नाही त्याचे अंगावर दीडशे ते दोनशे घाव घालण्यात आले असून या अमानुष मारहाणीत त्याचे अडीच तीन लिटर रक्त गोठल्याचे दिसून येत होते अशी माहिती बीड जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिल्याची माहिती सांगत आमदार पुढे म्हणाले की, संतोष देशमुख याला मारहाण करत असतानाचा व्हिडिओ काढण्यात आला असून त्या द्वारे कोणाला ही मारहाण झाल्याचे दाखवत होते त्याचे हे नाव शोधण्यात यावे तसेच संतोष देशमुख याचे अपहरण करून कळंब येथील एका महिलेकडे त्याला घेऊन जाऊन त्याचे विरुद्ध खोटी तक्रार दाखल करण्याचा या गुन्हेगारांचा उद्देश होता अशी माहिती आपल्याला मिळाली आहे असे सांगत आमदार धस पुढे म्हणाले की किरकोळ मारहाण झाल्यानंतर वास्तविक पाहता या आरोपींवर अदखलपात्र गुन्हा दाखल असला तरी प्रतिबंधक कारवाई करण्यासाठी तालुका दंडाधिकारी अथवा स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे कडे पाठवले असते तर या आरोपींना थोडाफार धाक राहिला असता आणि ते घाबरले असते तर हा पुढील अनर्थ टळला असता परंतु पोलिस कोणाच्या दबावाखाली होते ?

याची सखोल चौकशी करण्यात यावी असे मागणी करून आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की, बीड जिल्हा हा परभणी जिल्ह्याच्या शेजारी असून या ठिकाणी वाहणाऱ्या मोठ्या नद्यांमुळे मोठ्या प्रमाणात वाळू उपलब्ध असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा लिलाव न होता कोणतीही रॉयल्टी ची पावती न फाडता दिवसा ढवळ्या शासकीय मालमत्तेवर दरोडा घालून प्रत्येकी १० टन वाळू वाहतूक करण्याच्या क्षमतेचे ३००, ३०० हायवा दिवसा ढवळ्या रस्त्यावरून धावत असतात या वाहनांद्वारे कोट्यावधी रुपयांची दिवसभरात कमाई केल्याशिवाय ही गुन्हेगार मंडळी झोपत नाहीत या सर्व गुन्हेगारांचा सूत्रधार कोण आहे ? कोणाच्या आशीर्वादाने दिवसाढवळ्या शासकीय मालमत्तेवर दरोडा घातला जातोय ? याची चौकशी करण्यात यावी त्याचबरोबर मुंबई पेक्षाही बीड जिल्ह्यामध्ये शस्त्रास्त्र परवाने ज्यादा असून बाराशे ते तेराशे शस्त्रास्त्र परवानाधारक आहेत ते कसे परवाना मिळवतात ? याची मला माहिती आहे ते मी मुख्यमंत्र्यांना सांगणार आहे परंतु हे दिखाऊ कार्यकर्ते शस्त्र परवानाधारक हे गोरगरिबांना धाक दाखवण्यासाठी या पिस्तुलांचा वापर करतात ..धाब्यावर बसून ते फायरिंग करतात लग्नकार्यात देखील ते शस्त्र अडकवून आपण फार मोठे आहोत असे दाखवण्याचा असतात यांना कशासाठी शस्त्र पुरविण्यात आले आहे ? याची चौकशी होईपर्यंत या सर्व पिस्तूल रिवाल्वर परवानाधारकांची शस्त्रे बीड जिल्हाधिकाऱ्यांनी जमा करून घ्यावीत

संतोष देशमुख याचे मारेकरी असलेले विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतीक घुले आणि केदार या आरोपींचे गेल्या वर्षभरातील कॉल डिटेल्सची चौकशी करण्यात यावी गेल्या वर्षभरात ते कोणाला भेटले ? कोणा बरोबर फोटो काढले ? कुठे कुठे ते त्यांच्याबरोबर गेले होते ?

# जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिन संपन्न

**बीड :- १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक हक्क दिन संपन्न झाला. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुर्यवंशी , पोलीस उपअधीक्षक यु.म. कपूर, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे, अधिकारी कर्मचारी अल्पसंख्याक नागरिक उपस्थित होते.**

जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे यांनी प्रास्ताविकात अल्पसंख्याक समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. उपस्थित असलेल्या नागरिकांनी अल्पसंख्याकांबाबत विविध सूचना करुन श्री. स्वामी यांना मागण्यांचे लेखी निवेदन सादर केले. श्री. चिंचाणे यांनी सुत्र संचलन व आभार प्रदर्शन केले.


# बीड येथे एक दिवसीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

**बीड :- राज्यामध्ये निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी तसेच निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्यासाठी राज्याकडून व केंद्र शासनाकडून जिल्हा निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. निर्यात प्रचालन कार्यशाळा या प्रमुख मुद्द्यांचा अंतर्भाव असलेली एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड बीड येथे सकाळी १०:०० वाजता माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे.**

सदरील कार्यशाळेमध्ये तज्ञ मार्गदर्शक व अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु, मध्यम, उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी, सहकारी संस्था व उत्पादक प्रक्रिया उत्पादक केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य निर्यातीसंबंधी कामकाज करणारे घटक तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे.बीड जिल्ह्यातील सर्व उद्योग घटकांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे असे आवाहन किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र बीड यांनी केले आहे.

# कर्मयोगी संत गाडगे महाराज

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून



सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर-गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६८ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# गृहमंत्री अमित शहाच्या वक्तव्या निषेधार्थ लातूर शहर वंचित कडून भव्य निदर्शने

लातूर (प्रतिनिधी)

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला सुंदर अशी राज्यघटना दिली, त्यात भारतातील सर्व नागरिकास सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज निर्माण करणे, तेथील सर्व नागरिकात सामाजिक, आर्थिक, न्याय, स्वातंत्र्य, समानता प्रस्थापित व्हावी अशी उदात्त धोरण होते. त्याबरोबरच देशातील सर्व नागरिकांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा मान-सन्मान, आदर , राष्ट्राची एकता आणि एकात्मता आश्वासन देणारी बंधुता निर्माण करणे हा मूळ उद्देश आहे.परंतु ज्या भारतीय संविधानावर हा देश चालतो त्या देशात संसदीय लोकशाहीने दिलेल्या अधिकाराचा गैरवापर करून भर संसदेत देशाचे गृहमंत्री आर एस एस विचारधारेचे अमित शहा यांनी देशाचे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहेब या महामानवा बद्दल द्वेशात्मक भावनेने जाणून-बजून अपमान केला. महामानवाला देशातील अनेक जाती धर्मातील लोक हे देवा समान मानतात त्यांचे विचार अनुसरण करतात त्यांना वंदन करतात आणि हेच अमित शहा यांच्या पोटात रुतत असल्याकारणाने संसदेत महापुरुषांच्या




बद्दल अवमान कारक आणि केवळ जाती-जाती मध्ये धर्मा-धर्मामध्ये दंगली घडाव्या आणि एकमेका विषयी द्वेष निर्माण व्हावा म्हणून जाणूनबुजून असे वक्तव्य केल्याचे आहे. त्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी लातूर शहराच्या वतीने आज गांधी चौक लातूर येथे तीव्र निदर्शने करण्यात आले. त्याने केलेल्या वक्तव्याबद्दल अमित शहा ने लवकरात लवकर माफी मागावी अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा या आंदोलना दरम्यान वंचित बहुजन आघाडीचे लातूर शहराध्यक्ष सचिन अर्जुन गायकवाड यांनी प्रशासनाला दिला आहे.


यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोषभाऊ सूर्यवंशी, युवक प्रदेश सदस्य अमोल लांडगे, जिल्हा महासचिव रोहित सोमवंशी, शहराध्यक्ष सचिन अर्जुन गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष शेख खलील,विनोद खटके, डॉ. विजय अजणीकर, बौद्धाचार्य केशव कांबळे,जिल्हा सचिव प्रा. प्रशांत उघाडे सर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुरेश सूर्यवंशी, प्रचारक सय्यद सुफी साहब,युवक जिल्हा महासचिव नितीन गायकवाड, कामगार माथाडी जिल्हाध्यक्ष अमोल बनसोडे, लातूर ता.अध्यक्ष सुनील कांबळे, शहर महिला अध्यक्ष सुजाता अजनीकर, शहर महासचिव आकाश इंगळे,ब्लॅक पँथर संस्थापक अध्यक्ष अतुलजी गायकवाड, संस्थापक उपाध्यक्ष उषाताई धावारे, युवक शहराध्यक्ष महिंद्र बनसोडे, शहर सचिव दादासाहेब मस्के, शहर उपाध्यक्ष मनोज लेंढाणे,शहर सदस्य पठाण शरीफ, तालुका उपाध्यक्ष अशोक कांबळे, ड. उड्डाण सिंग,अरुण सूर्यवंशी, संजय सुरवसे, प्रसेनजीत कांबळे, शहर सल्लागार राहुल सूर्यवंशी, कमलाकर कवठेकर इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# हृदय जपाल तर निरोगी रहाल - डॉ सुनील बोबडे

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने दिनांक १८ डिसेम्बर रोजी वकील संघाच्या सदस्यांसाठी आरोग्यविषयक जनजागरण कार्यक्रमांतर्गत बीड येथील मेडिकेअर सुपर स्पेशालिटी अँड क्रिटिकल हास्पिटल बीड येथील सुप्रसिद्ध हृदय विकार तज्ज्ञ डॉ सुनील बोबडे व किडनी विकार व प्रत्यरोपण तज्ज्ञ डॉ अजित घोडके यांचे हृदयाचे व किडनीचे विविध विकार व उपचार व ते होऊ नयेत म्हणून घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना डॉ सुनील बोबडे यांनी सांगितले कि हृदय जपाल तर निरोगी राहाल.

बीड जिल्हा वकील संघाचे तीन तरुण सदस्यांचे नोव्हेंबर डिसेम्बर २०२४ दरम्यान हृदयविकाराने आकस्मिक निधन झाले, त्या अनुषंगाने कायद्याचे क्षेत्रात काम करताना वकील वर्गाला अनेक ताणतणावास सामोरे जावे लागते, परंतु तरुणपणात हृदयविकार आणि त्यामुळे आकस्मिक होणारा मृत्यू हा एक चिंतेचा विषय म्हणून डॉ बोबडे आणि डॉ घोडके





यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड रोहिदास येवले हे होते. यावेळी हृदयविकार व त्यापासून बचाव व तो होऊ नये यासाठी घ्यावायाची काळजी याविषयी डॉ सुनील बोबडे यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. त्यानंतर किडनीचे विकार, उपचार आणि ते टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याविषयी डॉ अजित घोडके यांनी वकील संघाचे सदस्यांना मार्गदर्शन केले. यावेळी वकील संघाचे सदस्यांनी विचारलेल्या शंका कुशंकांची समाधानकारक अशी उत्तरे दोन्ही डॉक्टर महोदयांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीड जिल्हा वकीलसंघांचे उपाध्यक्ष ॲड नितीन वाघमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल सचिव ॲड भीमा जगताप यांनी केले. या कार्यक्रमास बहुसंख्येने वकील संघाचे सदस्य उपस्थित होते.

# लक्ष्मण आण्णांनी विधानसभा निवडणुकीत संजयनगर वासियांना दिलेला शब्द पाळला

## संजयनगर येथील रहिवाशांकडून लक्ष्मण आण्णांनचे मानले आभार

गेवराई (प्रतिनिधी)

शहरातील संजयनगर येथे काही भागात लाईटच्या पोलची आवश्यकता होती संजयनगर येथील भिल्ल वस्तीच्या बाजुला असलेल्या भागात पोल नसल्याने त्या नागरिकांना खुप मोठ्या अंतरावरुन लाईट घ्यावी लागत असे त्यामुळे नागरिकांची गेल्या काही वर्षांपासून गैरसोय होत असे तेथील नागरिक पोल मिळावे म्हणून सातत्याने मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्याकडे पाठपुरावा करीत होते जनेतेच्या मागणीची दखल घेत मा.आ.लक्ष्मण आण्णांनी विज वितरण कार्यालयाकडे पाठपुरावा



करुन संजयनगर येथील विद्युत पोलचा प्रश्न मार्गी लावा अशा सुचना केली होती त्यानंतर विज वितरण कार्यालयाने तेथील रहिवाशांकडून मिटर घेण्यासाठी कोटेशन भरून घेतले होते तरी सुध्दा वेगवेगळे कारणे विज वितरण कार्यालय टाळाटाळ करत होते विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचरा दरम्यान लक्ष्मण आण्णांनी निवडणुकी नंतर तुमचा प्रश्न मार्गी लागेल असा शब्द दिला होता

विधानसभा निवडणुकी दरम्यान संजयनगर वासियांना दिलेला शब्द मा.आ.लक्ष्मण आण्णांनी पाळला आज.दि.१० डिसेंबर रोजी संजयनगर येथील लाईटचे पोल उभारण्यात येऊन त्यावर विद्युत तार घेऊन संजयनगर येथील रहिवाशांची अडचण काय्यमची मार्गी लावली यावेळी मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी,बाळासाहेब गायकवाड, शेख बाबा,शेख शौकत,.व नागरिक उपस्थित होते अनेक वर्षापासूनची अडचण दुर केली त्याबद्दल नागरिकांनी लक्ष्मण आण्णांनचे आभार व्यक्त केले आहे

# केज शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी केज शहराला नगरपालिकेचा दर्जा द्यावा

केज (प्रतिनिधी)

केज शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने अस्तित्वात असलेली नगरपंचायत नागरिकांना मुलभुत सुविधा देण्यात कमी पडत आहे.विकासाचे प्रश्न मिळणाऱ्या तोकड्या निधीमुळे प्रलंबित आहेत म्हणून केजला नगरपालिकेचा दर्जा देण्यात यावा अशीमागणी आ.नमिता मुंदडा यांनी विधिमंडळात केली आहे.

२००९ साली केजच्या ग्रामपंचायतीचे रूपांतर नगर पंचायतीमध्ये झाले त्यावेळी केजच्या विकासाला चालनामिळेल असा अंदाज होता परंतु तसे होत नसल्यामुळे शहराच्या विकासाची अनेक प्रश्न प्रलंबित राहिली आहेत.त्यातच आता शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे त्यामुळे निधीची कमतरता दिसू लागली आहे.नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्यातही नगरपंचायत अपुरी पडत आहे.त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे हीचबाब लक्षात घेत आ.नमिता मुंदडा यांनी शहराच्या विकासाची दारे खुली व्हावेत यासाठी विधिमंडळात केजला नगरपालिकेचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केली आहे.



सासूंनी नगरपंचायत आणली तर सून नगरपालिका आणणार !

दरम्यान २००९ मध्ये कै. विमलताई मुंदडा यांनी केलेल्या प्रयत्न व पाठ पुराव्यामुळे केजला नगर पचायतीचा दर्जा मिळाला होता.त्यामुळे शहराच्या प्रगतीची दारे खुली झाली होती.आता सासूच्या पावलांवर पाऊल टाकत आ.नमिता मुंदडा यांनी शहराला नगरपालिकेचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न चालवले आहेत.

# मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्यासह ना.पंकजाताई आणि ना.धनंजय मुंडे

## यांना राष्ट्रसंत वामनभाऊ पुण्यतिथी सोहळ्यास उपस्थित राहण्याचे महंत विठ्ठल महाराज यांचे निमंत्रण

आष्टी (प्रतिनिधी)

सबंध महाराष्ट्र आणि देशाच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या राष्ट्रसंत वामनभाऊ महाराज यांच्या श्रीक्षेत्र गहिनीनाथगडावरील ४९ व्या पुण्यतिथी सोहळ्यास उपस्थित राहावे अशा प्रकारचे निमंत्रण गहिनाथगडाचे महंत विठ्ठल महाराज यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे नूतन कॅबिनेट मंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि ना. धनंजय मुंडे यांना आग्रहपूर्वक देण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत माजी आ. भीमराव धोंडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, उत्तम बोडखे हे उपस्थित होते. संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांचा ४९ वा पुण्यतिथी सोहळा २१ जानेवारी २०२५ रोजी पाटोदा तालुक्यातील चिंचोली नाथ येथील श्रीक्षेत्र गहिनीनाथगडावर संपन्न होत आहे.



या दिवशी गहिनीनाथगडावर संपूर्ण महाराष्ट्र आणि देशाच्या काही भागातून राष्ट्रसंत वामनभाऊंचे भाविक भक्त आवर्जून राष्ट्रसंत वामनभाऊंच्या आशीर्वाद आणि दर्शनासाठी नतमस्तक होण्यासाठी येत असतात. भजन, कीर्तन, प्रवचन महाप्रसाद आदी सह विविध धार्मिक उपक्रमांची रेलचेल यावेळी असते. आरोग्य विभागाच्यावतीने मोफत आरोग्य निदान शिबिराचे ही आयोजन केलेले असते. भव्य यात्रेचे स्वरूप असून लाखो भाविक भक्तांची मांदियाळी यावेळी असते. राष्ट्रसंत वामनभाऊ महाराजांनी आयुष्यभर गोरगरीब, दीन, दलीत, दुबळ्या, अनाथ, अपंग, शेतकरी, शेतमजूर, वंचित घटकासह ऊसतोड कामगारांना अंधश्रद्धेपासून दूर राहून शिक्षणाची कास धरण्याचे आवाहन केले. समता, बंधुत्व, ऐक्य, धर्मसहिष्णुता आदि मूल्यांचा त्यांनी गावोगावी जाऊन प्रचार व प्रसार केला. त्यामुळे समाजातील लाखो जणांनी त्यांच्या विचार कार्याचा बोध घेऊन शिक्षणामध्ये उच्च पदावर जाण्याचा सन्मान मिळवला. भाऊंचे विचार आणि कार्य आधुनिक समाज रचनेचा पाया घालणारे आहेत. अशा या महान विभूतींच्या ४९ व्या पुण्यतिथी सोहळयासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्यासह बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र आणि भाऊंचे भक्त तसेच नूतन राज्य मंत्रिमंडळातील कॅबिनेट मंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि ना. धनंजय मुंडे आदीसह काही मान्यवर नामदार महोदयांना गहिनीनाथगडाचे महंत विठ्ठल महाराज आणि माजी आमदार भीमराव धोंडे यांनी प्रत्यक्ष भेटून पत्रिका देत गडावर येण्याचे आग्रहपूर्वक निमंत्रण दिले. या निमंत्रणाचा त्यांनी स्वीकार करून येण्याचे मान्य केले आहे.

# तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**नागपूर : महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचे राज्य करतानाच विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे. मागील अडीच वर्षात महाराष्ट्राच्या कायापालटाला सुरूवात झाली असून आता आमचं एकत्रित मिशन आहे समृध्द महाराष्ट्राचं. आता आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ. महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. ते म्हणाले की, मागील अडीच वर्षात महायुतीने विकास आणि कल्याणकारी योजनांचं ऐतिहासिक काम केले. मागील अडीच वर्षात विक्रमी कामे झाली. एकही दिवस सुटी न घेता आम्ही काम केलं. त्यामुळे या राज्याच्या निवडणूक निकालांत इतिहास घडला.**

अधिक गतिमान आणि लोकाभिमुख कारभाराचे वचन

मागील अडीच वर्ष आम्ही एक टीम म्हणून काम केले. त्यामुळेच आमचे सरकार हे जनतेचे लाडकं सरकार झाले. जनतेच्या विश्वासामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. आता अधिक गतिमान आणि लोकाभिमुख कारभाराचं वचन आम्ही देतोय. मुख्यमंत्री म्हणून काम करताना माझे धोरण गतिमान विकास हेच होते तिथे पक्षभेद, द्वेषाला कधी थारा दिला नाही.

विकासकामांचा स्ट्राईक रेट वाढतच राहणार

मागील अडीच वर्षात महायुती सरकारच्या विकासकामांचा स्ट्राईक रेट देशात सर्वाधिक होता. यापुढे हा स्ट्राईक रेट वाढतच राहणार आहे. महाराष्ट्राला देशात क्रमांक एकचे राज्य बनविण्यासाठी आम्ही सगळे दिवस-रात्र चोवीस तास काम करत होतोच यापुढेही करू अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

विदर्भ विकासासाठी ठोस पावले

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, माझे विदर्भाशी माझे वेगळे नाते आहे ते इथल्या प्रेम करणाऱ्या जनतेमुळे. मुख्यमंत्री असतांना मलाही विदर्भासाठी काहीतरी भरीव करण्याची संधी मिळाली याचा निश्चितच आनंद आहे. मागील दोन्हीही अधिवेशनात आम्ही विदर्भाच्या विकासासाठी ठोस पाऊलं उचलली आहेत आणि त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत. समृध्दी महामार्ग आपण गोंदिया, भंडारा, गडचिरोलीपर्यंत पुढे नेत आहोत. विदर्भातल्या ५ लाख शेतकऱ्यांना धान उत्पादनासाठी हेक्टरी १५ हजार रुपये बोनसची घोषणा मुख्यमंत्री म्हणून पहिल्याच अधिवेशनात मी केली होती. या बोनसची रक्कम आम्ही २० हजार केली आहे. विदर्भ लॉजिस्टिक हब म्हणून विकसित करायचा आहे.

विदर्भ, मराठवाडामधील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी ७० हजार कोटींच्या प्रकल्पांना मान्यता दिली आहे. सुरजागड येथे दोन नवीन प्रकल्प माझ्या कार्यकाळात सुरू झाले. मागील अडीच वर्षात आम्ही ८६ कॅबिनेट बैठका घेतल्या आणि ८५० महत्त्वाचे निर्णय घेतले. छोटे मोठे निर्णय सांगायला बसले तर एक अधिवेशन कमी पडेल, असेही ते म्हणाले.

# केमिस्ट अँड ड्रगिष्ट असो. नांदेड जिल्हाध्यक्ष शंतनू कोटगिरे यांचा वाढदिवस धार्मिक व सामाजिक उपक्रमाने साजरा

मुखेड /प्रतिनिधी
शिवकुमार बिरादार

नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनची जिल्हाध्यक्ष शंतनू सुधाकर कोडगिरे यांचा वाढदिवस संपूर्ण नांदेड जिल्ह्यात सर्व तालुक्यात व सर्कल निहाय धार्मिक व सामाजिक उपक्रम साजरा करण्यात आला असून नांदेड जिल्ह्यातील १६ तालुके व नांदेड शहरात या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले, त्यामध्ये धार्मिक स्थळांमध्ये जाऊन महापूजा महाआरती, मूकबधिर अंधशाळा, त्या ठिकाणी फळ वाटप करण्यात आले तसेच निवासी वसतिगृह, इंग्लिश स्कूल व जि.प. प्रा. शाळा येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची सुद्धा वाटप करण्यात आले. त्यामध्ये विशेषता मुखेड व मोहनावती नगरीची भूमिपुत्र असल्यामुळे या ठिकाणी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,





मुखेडचे येथील धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाची रूपरेषा प्रथमता ग्रामदैवत वीरभद्र स्वामी महाराज यांची महापूजा करून आरती करण्यात आली येथील भक्तांना प्रसाद देण्यात आला. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालय मुखेड येथे जाऊन सर्व रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. तसेच राजे शिव छत्रपती मिलिट्री अकॅडमी संचालक ज्ञानेश्वर डुमणे पाटील यांच्या उपस्थितीत व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने वृक्षारोपण चा कार्यक्रम पार पडला. व संध्याकाळी ठीक चार वाजता मुखेड मधील नामांकित राजमाता जिजाऊ वस्तीगृह येथील संचालक बिरादार सर यांच्या उपस्थितीत गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तेथील विद्यार्थ्यांना उपस्थित सर्व केमिस्टांच्या वतीने मार्गदर्शन व मेडिकल कोर्स विषयी व मेडिकल वापरा विषयी ज्येष्ठ केमिस्टांच्या वतीने सखोल मार्गदर्शन करण्यात आले व भविष्यामध्ये या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी बिरादार सर यांच्याकडून चांगले शिक्षण घेऊन कोणी डॉक्टर फार्मासिस्ट व्हावे अशी इच्छाही व्यक्त करण्यात आली

मुक्रामाबाद,बाराळी जांब केमिस्ट अँड ड्रगिष्ट असोसिएशन वतीने विविध सामाजिक उपक्रम करण्यात आली फळे व बिस्किट धार्मिक स्थळ मध्ये जाऊन महापूजा आरती प्रसाद वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित, बाळानंद गबाळे, संजय बिडवई गजू पत्की, बाळू सीतानगरे भगवान पाटील, निखिल काळे शिवकुमार बिरादार महेश देशमुख,राम पाटील, सागर चौधरी धोंडीबा पाटील जुने किशन पा जुन्ने, किशोर रुद्रकंटवार, शिवशंकर कुमदळे गोविंद सुवर्णकार ओम कोडगिरे, आदित्य नारलावार व सर्व मेडिकल केमिस्ट उपस्थित होते.

# मंत्रिपदापेक्षा भाजपाची संघटनशक्ती वाढवण्याला रवींद्र चव्हाण यांचे प्राधान्य

## भाजपा हीच आपली ओळख सांगत मंत्रिपदावरून नाराज नसल्याचे चित्र

पुणे: भारतीय जनता पार्टी हीच आपली ओळख असून, मंत्रिपदापेक्षा पक्षाची संघटनशक्ती वाढवणे अधिक महत्वाचे आहे. त्यामुळे मंत्रिमंडळात समावेश झाला, की नाही याला फार महत्व नाही. भाजपाला अधिक बळकट करण्यासाठी निष्ठेने यापुढे काम करत राहणार असून, पक्षनिष्ठेला प्राधान्य असल्याचे भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, आमदार रवींद्र चव्हाण यांनी दाखवून दिले आहे.

महायुती सरकारमध्ये यावेळी मंत्रिमंडळात अनेक नविन प्रॉमिसिंग चेहऱ्यांना संधी देताना काही अनुभवी, मातब्बर नेत्यांना वगळण्यात आल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या २-३ दिवसांपासून नाराजीनाट्य सुरु आहे. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस तीनही पक्षातील नेत्यांनी उघडपणे नाराजी बोलून दाखवली आहे. सुधीर मुनगंटीवार, संजय कुटे, छगन भुजबळ, तानाजी सावंत, नरेंद्र भोंडेकर यांच्यासह इतरांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वी एकसंध असणाऱ्या महायुतीमध्ये आता मंत्रिमंडळ आणि खातेवाटपावरून भूकंप होतो का? याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे. परंतु या नाराजीनाट्याला देवेंद्र फडणवीस यांचे राइट हँड रवींद्र चव्हाण अपवाद ठरले आहेत.

सरकारमधील असो किंवा पक्ष संघटनेच्या दृष्टीने, गेल्या काही वर्षांतील रवींद्र चव्हाण यांची कामगिरी निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या ऐतिहासिक विजयात देवेंद्र फडणवीस यांच्या खालोखाल रवींद्र चव्हाण यांचे योगदान असल्याचीही चर्चा झाली. मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपमधील चर्चेत असलेल्या नावांमध्ये चव्हाण यांचे नाव आघाडीवर होते. मुख्यमंत्रीपदी फडणवीस निश्चित झाल्यानंतर त्यांच्या 'सुपर कॅबिनेट' मधील एक प्रमुख नाव म्हणून रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाहिले जात असताना त्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. तरीही चव्हाण यांच्याकडून कुठल्याही प्रकारे नाराजीचा सूर उमटला नाही. त्यामुळे त्यांच्या पक्षनिष्ठेची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

नागपूर येथील विधानभवन परिसर, भाजपा विधीमंडळ कार्यालय येथे अनेक मंत्री, नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्यासोबत रवींद्र चव्हाण अतिशय खेळीमेळीने वागत आहेत. त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट्सवरही



कोणतीही नाराजी दिसून आली नाही. अतिशय शांततेत आधीचा बायो बदलून त्याजागी 'आमदार, डोंबिवली शहर' इतकेच लिहिले आहे. त्यामुळेच त्यांची ही शांत, संयत भूमिका चर्चेचा विषय ठरली आहे. रवींद्र चव्हाण समर्थकांनी शांत राहण्याची घेतलेली भूमिका अधिक प्रगल्भ दिसत आहे. स्वत:सोबतच समर्थकांची समजूत काढण्यात रवींद्र चव्हाण यशस्वी ठरले आहेत. 'भाजपा हीच माझी ओळख आहे' असे सांगणाऱ्या चव्हाण यांच्याकडून 'राष्ट्र प्रथम, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वत:' हीच भाजपची विचारधारा पालन केली जात असल्याचे जाणकार नमूद करतात.

# आश्वासने पूर्ण होणार;योजना बंद होणार नाहीत ...महाराष्ट्र आता थांबणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## लाडक्या बहिणींचा देय हप्ता अधिवेशनानंतर जमा होणार, शेतकऱ्यांना वीज बील नाही

नागपूर :- राज्यातील शेतकरी, युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक, वंचित घटकाला दिलेली आश्वासने पूर्ण केली जातील. शासनाच्या सुरु असलेल्या योजना बंद होऊ देणार नाही, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला दिला. राज्यातील लाडक्या बहिणींना त्यांचा देय हप्ता अधिवेशन संपल्यावर देण्यात येईल, अशी ग्वाही देत महाराष्ट्र कालही नंबर एक होता, आजही नंबर एक आहे आणि उद्याही नंबर एकच राहील, महाराष्ट्राशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिमानाने व आत्मविश्वासाने विधानसभेत स्पष्ट केले.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात १ जुलै २०२२ पासून ३ लाख ४८ हजार ७० कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आली असून यामुळे २ लाख १३ हजार २६७ इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यात १० मोठ्या प्रकल्पांना आपण मंजूरी दिली असून यामध्ये २ लाख ३९ हजार ११७ कोटींची गुंतवणूक तर ७९ हजार ७२० इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. विदर्भातील ४७ मोठ्या प्रकल्पात १ लाख २३ हजार ९३१ कोटींची गुंतवणूक होऊन ६१ हजार रोजगार निर्मिती, मराठवाड्यात ३८ प्रकल्पात ७४ हजार ६४६ कोटी गुंतवणूक व ४१ हजार ३२५ रोजगार निर्मिती आणि उर्वरित महाराष्ट्रात १३६



प्रकल्पात १ लाख ४९ हजार ४९३ कोटींची गुंतवणूक होऊन १ लाख १० हजार ५८८ रोजगार निर्मिती होत आहे. यामुळे महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे. छ. संभाजीनगर, जालना या ठिकाणी देखील उद्योगाचे जाळे विकसित होत आहे. राज्यात वसुलीबाजांना थारा दिला नाही तर राज्याच्या प्रगतीचा वेग दुप्पट होईल. अशा वसुलीबाजांवर आता कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा छत्रपती शिवाजी महाराजांनी दिला. त्यानंतर केंद्रातील मोदी सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा संविधानानुसार दिला. यामुळे मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी निधी मिळणार आहे. तसेच विद्वानांना दोन पुरस्कार मिळणार आहेत. प्राचिन ग्रंथांचा अनुवाद करण्यात येणार आहे. या सर्व प्रयत्नांसह आपण आपली भाषा रूजविणार आहोत. आता न्यायालयाती निवाडे मराठीत उपलब्ध करण्यास सुरूवात होणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी गेल्या अडिच वर्षात १६७ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून यामुळे २५.२१ लक्ष हेक्टर जमिन सिंचनाखील येणार आहे. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प आम्ही केला असून नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवार योजना आणि जलसिंचन प्रकल्प यासाठी उपयुक्त आहे. वैनगंगा-नळगंगा, नारपार-गिरणा, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे असे नदी जोडप्रकल्प मार्गी लावणार असल्याने विकासाला गती मिळणार आहे. राज्यातील शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्यासाठी, शेतकऱ्यांच्या पिकाला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी नदीजोड प्रकल्प महत्वाचे आहेत. यासाठी राज्य शासनाने जल आराखडा तयार केला आहे. राज्यात बांबू लागवडीला प्रोत्साहत देण्यात असून यामुळे देखील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

मेट्रो प्रकल्प गतीमान

मुंबई, नागपूर, पुणे या शहरांमध्ये मेट्रोच्या कामाला अधिक गती देण्यात आली आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांचा प्रवास अधिक गतिमान होणार आहे. मुंबईत मेट्रो टप्पा ३ चे काम अंतिम टप्प्यात असून बीकेसी ते कुलाबा ही नवीन लाईफ लाईन होणार आहे. १७ लाख प्रवाशी प्रवास करणार आहेत. मे २०२५ पर्यंत ही लाईन खुली होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे जनरल सेक्रेटरी भारत लाल यांच्या हस्ते कडूदास कांबळे दिल्लीत सन्मानित

दिल्ली (प्रतिनिधी)

आझाद क्रांती कामगार युनियनचे अध्यक्ष कडूदास कांबळे यांचा देशाच्या राजधानीत विश्व युवक केंद्र दिल्ली येथे १८ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे जनरल सेक्रेटरी भारत लाल यांच्या हस्ते तर पोपुलेशन फाउंडेशन ऑफ इंडियाच्या एक्झॅक्टिव्ह डायरेक्टर पूनम मुत्रेजा, मेंबर ऑफ पार्लमेंट संजना जाटव, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या अमरजीत कौर, क्शन एड असोसिएशनचे एक्झिटिव्ह डायरेक्टर संदीप चाचरा यांच्या प्रमुख उपस्थितिमध्ये सन्मान करण्यात आला.




असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांना तसेच वंचित समूहांना त्यांचे न्याय हक्क आणि अधिकार मिळवून देण्याची भूमिका योग्य पद्धतीने बजावत असल्याबाबत हा सन्मान करण्यात आला. यापुढेही सर्वांच्या भल्यासाठी सामूहिकपणे सामाजिक कार्याची धुरा आपण सांभाळण्यास सक्षमपणे काम करावे त्यासाठी आम्ही आपल्या सोबत आहोत अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

सामाजिक न्यायाची लढाई लढत असताना संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सक्षमपणे कडुदास कांबळे यांना साथ देणाऱ्या मानवी हक्कासाठी जमिनीवरची लढाई लढणाऱ्या राधिकाताई चिंचोलीकर (हिंगोली), समीक्षा गणवीर (नागपूर), शेख शबाना (सांगली) या रण रागिणी सन्मान स्वीकारत असताना सोबत होत्या. हा सन्मान माझा वैयक्तिक नसून वंचित समूहांना न्याय देण्यासाठी ताकत देणाऱ्या त्या सर्व महिला पुरुष कार्यकर्त्यांचा आहे अशा भावना यावेळी कडुदास कांबळे यांनी व्यक्त केल्या.मानवी अधिकाऱ्यासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांचे राष्ट्रीय स्तरावरील अधिवेशन १७ आणि १८ डिसेंबर रोजी विश्व युवक केंद्र, त्रिमूर्ती मार्ग, चाणक्य पुरी नवी दिल्ली येथे क्शन एड असोसिएशन संस्थेने आयोजित केले होते. देशातील संपूर्ण राज्यातून प्रमुख कार्यकर्ते या अधिवेशनासाठी उपस्थित होते. या विचार मंचावर अनेक कार्यकर्त्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.मानव अधिकारासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी करण्यासाठी क्शन येड असोसिएशन संस्थेचे तनवीर काझी, मनीषा भट्ट, सुभाष कुमार, दिपाली शर्मा, हिरा, जवान सिंग, मसूद, सायन कोंगारी, नारायणज्योती भुयान, देबारात पत्रा, मशकूर आलम, खलिद चौधरी, पंकज कुमार, राघव यांनी विशेष परिश्रम घेतले.समारोपाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा आणि रश्मी यांनी केले.

# सिंदफणा पाणीदार करून गेवराई तालुका दुष्काळमुक्त करावा

## आ.विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई तालुका गोदावरी आणि सिंदफणा नदीच्या कुशीत वसला असला तरी तो सिंचनापासून दुर्लक्षित आहे. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून गोदावरी नदीपात्रात झालेल्या बॅरेजच्या श्रृंखलेमुळे गोदाकाठ ओलिताखाली आला असला तरी सिंदफणा नदीचा काठ मात्र दुष्काळग्रस्त राहिला आहे. यासाठी टाकळगाव को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामास तात्काळ प्रशासकीय मान्यता द्यावी आणि इतर बॅरेजेसच्या कामाचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले असल्यामुळे त्यासही मान्यता देण्याची कार्यवाही करून सिंदफणा नदी पाणीदार करून गेवराई तालुका दुष्काळमुक्त करावा अशी मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे विधानसभेत केली.

सिंदफणा नदी पाणीदार करण्याच्या ड्रीम प्रोजेक्टची संकल्पना जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी सातत्याने मांडली, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांनी मतदारांना याबाबतचे आश्वासन दिले होते. आ.विजयसिंह पंडित यांच्या जाहिरनाम्यातही त्याचा उल्लेख



आहे. मतदारांना दिलेल्या आश्वासनाची पुर्ती करण्यासाठी आ.विजयसिंह पंडित यांनी हा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे विधानसभेत उपस्थित केला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, टाकळगाव-हिंगणी को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने मान्यता दिली असून त्यास बाब क्र.१४० नुसार अर्थसंकल्पीय निधीची तरतुद करण्यात आली आहे. केवळ मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर हा प्रस्ताव ठेवून त्यास मान्यता देणे बाकी आहे. त्यामुळे या प्रस्तावास तात्काळ प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी आ.पंडित यांनी केली.

पुढे बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, सिंदफणा नदीवरील ईटकुर, अंकुटा, खुंड्रस, कुक्कडगाव, नाथापूर आणि बिंदुसरा नदीपात्रातील नामलगाव या को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामाचे सर्व्हेक्षण आणि अन्वेषणाचे काम पूर्ण झालेले आहे, त्याचाही प्रस्ताव शासनाने मागून घेवून त्यास प्रशासकीय मान्यता देण्याची त्यांनी मागणी केली. सिंदफणा नदीकाठच्या गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि कायमस्वरुपी दुष्काळाचे निर्मुलन करण्यासाठी बॅरेजची आवश्यकता असल्याची बाब त्यांनी यावेळी अधोरेखित केली. या बॅरेजमुळे गेवराई विधानसभा मतदार संघातील ३५ हजार एकर जमीन ओलिताखाली येणार असल्याचे आ.पंडित यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीतील प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनाची पुर्ती करण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी समाज माध्यमातून सांगितले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).



परभणी -जिल्ह्यातील जिंतूर विधानसभा मतदारसंघातून निवडून येण्याची हॅट्रिक साधणाऱ्या लोकप्रिय, विकास प्रमुख आमदार मा. मेघना ताई बोर्डीकर यांची महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून शपथ देण्यात आले.त्यामुळे जिंतूर मतदारसंघाबरोबरच संपूर्ण परभणी जिल्ह्यात समर्थकांनी आनंद उत्सव साजरा केला. सामाजिक कार्यकर्त्या सौ राधिका शिंदे यांनीही मेघना त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या त्याप्रसंगी घेतलेले छायाचित्र. ( गितांजली लव्हाळे )

# अंकुशराव माधवराव पवार यांचे निधन

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई शहरातील रहिवासी सेवानिवृत्त शाखा अभियंता अंकुशराव माधवराव पवार यांचे पुणे येथे उपचार दरम्यान दुःखद निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी गुरुवार दि.१९ रोजी शहरातील चिंतेश्वेवर स्मशानभूमीत करण्यात आले.



अंकुशराव पवार हे गेल्या काही महिन्यांपासून दिर्घ आजारी होते. त्यांच्यावर पुणे येथे बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली होती. परंतु ही शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्याने त्यांना बुधवारी हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. गुरूवार रोजी गेवराई शहरातील चिंतेश्वर स्मशानभूमीत सकाळी ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक मित्र परिवार मोठ्या संख्येने या दुखात सहभागी होता. त्यांच्या जाण्याने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा व दोन मुली असा परिवार आहे.

# अमित शहा यांच्या त्या बेताल वक्तव्याचा तीव्र निषेध



संविधान निर्माते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत संसदेमध्ये अमित शहा यांनी जे वक्तव्य केले आहे ते वक्तव्य जातीवादी प्रवृत्तीमुळे व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत असणरा तिरस्कार यातूनच केलेले आहे पण खऱ्या अर्थाने ज्या महामानवाला संपूर्ण जगच नॉलेज ऑफ सिम्बॉल म्हणतात त्यांनी या देशांमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्याकरता अथांग असे परिसरात घेतलेली आहे आणि म्हणूनच आज आपण गुण्यागोविंदाने अखंड भारतामध्ये राहत आहे आंबेडकरांच्या मुळे या मनुवादी संस्कृतीतील बाराबलुतेदार व अठरा आलूतेदार असणाऱ्या समाजाला

अस्पृश्यतेच्या नरकातून बाहेर काढून समानता, मानवता आणि स्वातंत्र्याच्या स्वर्गाची दारे खुली करणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर असंख्य लोकांसाठी उदारकर्ते आहेत. त्यामुळे अमित शहा यांनी आपले बेताल वक्तव्य मागे घ्यावी अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाऊ निकाळजे यांच्या आदेशाने जिल्हाधिकाऱ्यांवर निषेध आंदोलन करणार दादासाहेब ओव्हाळ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष सातारा

# बीड येथे एक दिवशीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

बीड (लोकदिशा न्युज)

राज्यामध्ये निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी आणि निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्यासाठी राज्याकडून व केंद्र शासनाकडून जिल्हा निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. निर्यात प्रचालन कार्यशाळा या प्रमुख मुद्द्यांचा अंतर्भाव असलेली एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड बीड येथे सकाळी १०:०० वाजता माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु, मध्यम, उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी, सहकारी संस्था व उत्पादक प्रक्रिया उत्पादक केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य निर्यातीसंबंधी कामकाज करणारे घटक तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्व उद्योग घटकांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे असे आवाहन श्री किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र बीड यांनी केले आहे.



आज बुधवार दि.१८/१२/२०२४ रोजी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे, महाराष्ट्र राज्याच्या लोकनेत्या ना.पंकजाताई साहेब मुंडे यांची भेट घेतली व विठ्ठल - रुखमाईची मुर्तीरुपी प्रतिमा भेट म्हणून दिली व मंत्रिमंडाळात समावेश झाल्याबद्दल अभिनंदन केले . तसेच ताईसाहेबांना पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी माझ्यासह भाजपा मा.जिल्हा उपाध्यक्ष अनिलजी चांदणे व भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ओबीसी मोर्चा तथा पिंपळवाडी सरपंच गणेशजी बहिरवाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# बिनखात्याच्या मंत्र्यांसह सुरू झालेले पहिले हिवाळी अधिवेशन

## विधान परिषदेच्या सभापतीपदी भाजपाचे नेते प्रा.राम शिंदे यांची निवड

नागपूर/ प्रतिनिधी-

राज्यात विधानसभेच्या निवडणुका पार पडल्यानंतर हिवाळी अधिवेशन राज्याच्या उपराजधानीत म्हणजेच नागपुरात सुरू झाले.बिनखात्याच्या मंत्र्यांसह सुरू झालेले हे विधानसभेचे पहिलेच अधिवेशन आहे.नागपूर अधिवेशन सुरू होण्याच्या आदल्या दिवशी मंत्र्यांचा शपथविधी पार पडला. आणि मंत्रिमंडळ तयार झाले; पण सदस्यांकडे खाते नाही. कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री यांची संस्या पुरेशी आहे पण त्यांनी कोणत्या विषयावर बोलायचे हेच मात्र ठरलेले नाही.आणि अशा परिस्थितीत सुरू असलेले हिवाळी अधिवेशनात राज्यातील जनतेच्या विविध प्रश्न उपस्थितत करणाऱ्या विरोधी पक्षाच्या सदस्यांना सरकारमधील कोणी द्यायचे ,असा गोंधळ महाराष्ट्र राज्याच्या राजकीय इतिहासात प्रथमच समोर आला आहे. विलंब हे नवीन महायुती सरकारच्या जणू वैशिष्टयच ठरले आहे, की काय अशी परिस्थिती आहे.२३ नोव्हेंबर रोजी भाजपा,शिवसेना,आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या तिघांचे २३० सदस्य विधानसभेच्या जागा जिंकून विजयी झाले.२८८ सदस्यीय असलेल्या विधानसभेत महायुतीचे प्राबल्य आहे.मात्र सरकार बनविण्यासाठी महायुतीला दोन आठवडे लागले.हा विलंब मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या पदावरील तडजोडीमुळे




झाला.हे मात्र दिसून आले.अखेर ५ डिसेंबर २०२४ रोजी भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री तर शिवसेनेचे एकनाथ शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अजित पवार यांनीही मुंबईतील आझाद मैदान या ठिकाणी झालेल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत शपथ घेतली.त्यानंतर मंत्र्यांची निवड करण्यात आणखी काही काळ घालविला.संभाव्य मंत्र्यांची यादी तयार करण्यात आर्धा महिना लोटला. राज्याच्या उपराजधानीत दरवर्षीप्रमाणे हिवाळी अधिवेशन आयोजित करण्यात आले.त्या अधिवेशनाच्या आदल्या दिवशी मंत्र्यांचा शपथविधी सोहळा आयोजित करण्यात आला होता.अधिवेशन काळात नव्याने नियुक्त करण्यात आलेले ३३ कॅबिनेट व ६ राज्यमंत्री त्यांच्याकडील जबाबदारीबाबत अनभिज्ञ होते. अशा परिस्थितीत सत्ताधारी आघाडीकडून कामकाज सुरळीत सुरू असल्याचे भासविले जात आहे.आज विधानपरिषदेच्या सभापतीपदी भाजपाचे नेते प्रा.राम शिंदे यांची निवड झाली.सभापती पदासाठी त्यांचा एकमेव अर्ज आलेला असल्याने शिंदे यांची निवड निश्चित मानली जात होती. शिंदे यांच्या निवडीमुळे राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सर्वोच्च पिठासीन अधिकारी हे पद भाजपाकडे आले आहे.या हिवाळी अधिवेशनात राहुल नार्वेकर यांची विधानसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रामराजे निंबाळकर यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ७ जुलै २०२२ पासून विधानपरिषदेचे सभापतीपद रिक्त होते. सध्या विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे या आहेत.मंत्र्यांना खातेवाटप जाहीर न करता सुरू होणारे हे या वर्षाचे विधिमंडळ अधिवेशन फार वेगळे मानले जात आहे.हिवाळी अधिवेशन सुरू होण्याच्या २४ तासांपूर्वी शपथ घेतलेल्या मंत्र्यांना त्यांना त्यांच्या कार्यविभागाची कल्पना नसल्याचे चित्र आहे.आता हिवाळी अधिवेशन सुरू होऊन तीन दिवस झाले,तरी खातेवाटप झाले नाही.

## सायबर गुन्हेगारी लेख क्रमांक: २

# चोराच्याच हातात चावी देताय?

सोशल मीडिया हे तंत्रज्ञान आहे आणि कोणत्याही तंत्राच्या जशा जमेच्या बाजू असतात तशा उणिवाच्या बाजू यातही आहेत. आपण त्या जाणून घेतल्याशिवाय त्याचा वापर करणं आपल्यालाच अडचणीत आणू शकतो याची जाणीव सर्वांना असायला हवी.. वाहनाला ब्रेक असतात ते सुरक्षेच्या कारणासाठी आणि त्याचाच वापर करून आपण गतिमान प्रवास करू शकतो त्याच प्रकारे त्याच्या सर्व बाजू आपण तपासायला पाहिजेत. सायबर गुन्हेगारीत वाढ होण्यासोबत इतर प्रकारचे गुन्हे वाढण्याचं कारण देखील इंटरनेट बाबत पूर्ण ज्ञान नसणं हे आहे या माध्यमातून आपण कळत नकळत गुन्हेगारीला आमंत्रण तर देत नाही ना याबाबत सर्वांनीच विचार करावा.माहितीचा महापूर आणण्यासोबत या माध्यमाने आपल्याला वाचक वर्ग निर्माण करता येतो म्हणून अनेक जण लिहिते झाले परंतु त्या माध्यमाचा गैरवापर करणारे देखील यात सामील झाले आहेत याची जाणीव ठेवूनच सर्वांनी कृती करावी.सध्याची रिल्सची क्रेझ



आहे ती चोरांना चक्क आमंत्रण ठरतेय सहकुटुंब गोवा सहलीवर असं म्हणत टाकलेली रील असो की 'सहकुटुंब तीर्थयात्रेवर' अशी रील या रिअलटाईम शेअरिंगने चोरांना कळतं आपलं घर मोकळं आहे. तीर्थयात्रा आपण करतो पण चोर मात्र प्रसाद तुमच्या घरातून चोरी करून मिळवतात अशा घटना हल्ली वाढल्या आहेत. आपण उत्साहाच्या भरात ठशवळींळाश व्हिडिओ माहिती शेअर करण्याबाबत अतिशय गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. सहल संपल्यानंतर सहलीचे फोटो आपल्याला माध्यमावर टाकता येतात. ज्याला टींर्श्रळीं ींळाश म्हणतो असा वेळ कुटुंबासोबत घालवावा यात कुटुंबाला मिळणारा आनंद महत्त्वाचा आहे.हल्ली चौकोनी किंवा त्रिकोणी कुटुंब आहेत आणि बहुतेक घरात सध्याच्या धक्काधक्कीच्या आणि व्यस्त जीवनशैलीमुळे एकमेकांना वेळ देणे शक्य होत नाही या पार्श्वभूमीवर आपण या बाबीचा विचार करण्याची गरज आहे.

यातून आपण वाढलेल्या गुन्हेगारीला ज्यात चोरी-घरफोडी अशांचा समावेश अशांचे कारण देखील 'सायबरवेड' हेच आहे. अनेक बाबतीत घडणारा आणखी एक गुन्हयाचा प्रकार म्हणजे 'तुमचीच चोरी' वाचायला जरा वेगळं वाटलं तरी हे सत्य आहे आपल्या प्रोफाइलची हुबेहुब प्रतिकृती करून प्रोफाइल नव्याने सादर होते आणि आपण अडचणीत आहोत पैशाची गरज आहे असे संदेश मित्र व नातेवाईकांना जातात यातून अनेक प्रकारे लुटले जाते एका वरिष्ठ आय.ए.एस अधिकाऱ्याबाबत हा प्रकार ३ वेळा घडल्याचे मी स्वतः बघितले आहे.सायबर सुरक्षित गोपनीयता आणि शेअरिंग बाबतची काळजी यासाठीच महत्त्वाची असते. 'बडे धोके है इस रहामें ' हे कायम लक्षात ठेवा तुम्ही सुरक्षा बाळगली नाही तर त्याचा तोटा तुम्हालाच होणार आहे याची जाणीव ठेवून काम करा व शक्यतो ठीरश्र ींळाश व्हिडिओ टाळा.

**-(प्रशांत विजया अनंत दैठणकर)**

# अल्पसंख्याक समितीवर अशासकीय सदस्य नोंदणसाठी अर्जाचे आहवान

**बीड :- अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्यांकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला असून जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीवर शासकीय अधिकारी त्या त्या जिल्ह्याचे राज्यसभा, लोकसभा तसेच विधानसभा सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या ३ नामवंत संस्थाचे अशासकीय प्रतिनिधी समितीवर सदस्य असणार आहेत.**

अल्पसंख्यांकासाठी काम करणाऱ्या ३ नामवंत स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी यांचे नामनिर्देशन शासनास सादर करण्याकरिता शासन निर्णयानुसार व १५. ४. २०१७ मध्ये दिलेल्या दिशानिर्देशानुसार अनुसरून इच्छुकांनी अर्ज प्रस्ताव दिनांक २६ डिसेंबर २०२४ पर्यंत विहित नमुन्यात सादर करण्याचे आवाहन, जिल्हा नियोजन कार्यालय बीडतर्फे करण्यात आले आहे.

इच्छुक उमेदवाराकडून सादर करण्यात येणाऱ्या अर्ज प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. नाव, पत्ता, जन्म दिनांक, व्यवसाय, शिक्षण, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी .अल्पसंख्यांकांसाठी काम करणा-या नामवंत समाजसेवी संस्थाचे प्रतिनिधी असल्याचे प्रमाणपत्र.( संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा स्वाक्षरीने अधिकृत) अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी करण्यात आलेल्या सामाजिक कार्याची माहिती. जिल्हास्तरावर अल्पसख्यांक कल्याण समितीवर निवड झालेल्या प्रतिनिधींना, सदस्यांना कोणतेही मानधन व बैठक भत्ता देय होणार नसल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकात नमूद केले आहे.

# राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे येथे बदनापूर तालुक्यातील महिला सरपंच यांचे प्रशिक्षण संपन्न



बदनापूर-(प्रतिनिधी)ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने आकांक्षित तालुक्यातील कार्यारत महिला सरपंचासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांच्या मार्फत दि. ०९ - ११ डिसेंबर २०२४ या कालावधीत निवासी प्रशिक्षण आयोजित करन्यात आले होते.

डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, ख-ड तथा उपमहासंचालक यशदा, श्रीमती. स्नेहा देव, सत्र संचालक, श्रीमती. ज्योती राठोड, गटविकास अधिकारी तसेच ग्रामीण विकासाशी संबंधित विविध प्रशिक्षक याचें मार्गदर्शन लाभले.

विविध प्रशिक्षकानी, शाश्वत विकासाची उद्दिष्टे, ग्रामपंचायत विकास आराखडा, आकांक्षित तालुका अभियान, ग्रामपंचायतिचे कलम व अधिनियम, अर्थ व वित्त व्यवस्थापन, यशस्वी सरपंच यांच्या यशोगाथा, व्यक्तिमत्व विकास आणि संवाद कौशल्य, संघ बांधणीअशा विविध विषयावर मार्गदर्शन करून व्यावहारिक अनुभव दिला. यावेळी बदनापूर तालुका गटविकास अधिकारी श्रीमती ज्योती राठोड यांच्या विशेष प्रोत्साहनपर महिला सरपंच यानी उपस्तिथी लावली तसेच श्री. सतीश कचकुरे, आकांक्षित तालुका समन्वयक यानी प्रशिक्षण समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली .